Vol II Issue VIII

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 8, Sept 2012
ISSN:-2230-7850

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# अजिंठा चित्रकला व नवरस

छाया दत्तात्रय कुलकर्णी

(M.A.) Ph. D विद्यार्थी संशोधक

***प्रस्तावना :–***

अजिंठा चित्रकला म्हणजे भारतीय कलेस पडलेले व प्रत्यक्षात उतरलेले सुंदर स्वप्नच आहे. गिरीकंदरात घडलेला हा कलाविष्कार पाहून कोणीही स्तिमीतच होतो. त्यात घडणारे प्रसंग भावभवानांचा अविष्कार चित्रातील रंगसंगती गतीमानता केवळ अद्वितीयच विविध जातक कथेतील प्रसंग अतिशय परिणामकारकरितीने रेखाटले आहेत. भगवान बुध्दांच्या पूर्वजन्मीच्या या कथा यातील अनेक प्रसंगाना अजिंठा चित्रकारांनी जिवंत केले आहे.

उद्देश :-

अजिंठा येथील विविध प्रसंगात दिसर्णाया व्यक्त होर्णाया नवरसाचा अभ्यास करणे.

चर्चा :-

मानवी जीवन हे आनंद दुःख भय उदासी अशा विविध भावनांनी भरलेले आहे. भारतीय साहित्यात नवरस म्हणूनच सांगितले आहेत. जीवनातील हे रस विविध कलाप्रकारतही दिसून येतात. चित्रकलेतूनही हे रस दिसून येतात. हे नवरस पुढीलप्रमाणे आहेत.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1)शृंगार | 2) | हास्य | 3) | करूणा | 4) | रौद्र | |
| 5)वीर | 6) | भयानक | 7) | बीभत्स | 8) | अद्भूत | |

9)शांत (गुप्त एस.पी.ः 2002; 55)

असे हे नवरस अजिंठा चित्रप्रसंगातून कसे व्यक्त होतात हे आपण पाहू.

1)महाजनक जातक :- गुफा क.1 मध्ये महाजनक जातकाच्या कथेतील प्रसंग चित्रित केला आहे. तो म्हणजे महाजनकाच्या गृहत्यागाचा प्रसंग महाजनक जेव्हा ऐहिक सुखाचा त्याग करून गृहपरित्यागाचा र्निय राज्ञी शिवलीला ऐकवतो तेव्हा महाजनकाच्या या निर्णयाने शिवली निस्तब्ध निर्विकार होते. तिच्या निर्जिव हातातील कमळफुले खाली पडण्याच्या बेतात असे चित्रणा येथे आहे. महाजनकाची निश्चयी मुद्रा शिवली व आसपासच्या दासी यांच्या चेर्हयावरील कारूण्याचे रेखाटन चित्रकाराने कुशलतेने केले आहे. (थत्ते ः रा.अ.ः 2004; 48) जोडीदाराच्या विरहाचे दुःख शिवलीच्या चेर्हयावर करूणपणाने उमटले आहे. या चित्रात करूण्यरस प्रभावीपणे व्यक्त झाला आहे.

2)पद्मपाणि बोधीसत्व :- शांत रसाचा अनुभव आपणास गुफा क.1 मधील “पद्मपाणि बोधीसत्व” हे चित्र पाहून येतो. त्रिभंगावस्थेतील पद्मपाणी करडया पिवळसर रंगाने रंगविलेला जरासा लांबट उभट चेहरा धनुष्याकृती भृमध्य जोडलेल्या भुवया मत्स्याकृती नेत्र नासाग्रावर खिळलेली दृष्टी मंद स्मित करणारे ओठ गंभीर मुखावर असीम आनंदी भाव अंगावर वेचकपण मोजकेच अलंकार असे पद्मपाणिचे चित्रण झाले आहे. (माटे ः म.श्री. ः 1947; 67) या एकटया पद्मपाणि चित्रातून शांतरस आपल्या मनावर बिंबतो. पद्मपाणिच्या मुखावरील भाव पवित्र शांततेचा अनुभव देतात.

3)मारविजय :- गुफा क.1 मधील या कथेच्या चित्रणात बुध्दास अर्हतपदापासून पदच्युत करण्यासाठी मार सर्व सामर्थ्यानिशी येतो. माराच्या सर्व सेवेचे चित्रण आपल्याला बुध्ददेवाच्या भोवती गोलाकारात चित्रित केलेले दिसते. यातील दोन जाखिणींचे भयानक चेहरे रानडुक्कर कुर अस्वल पाहून भयानकतेचा अनुभव येतो. यानंतर माराने बुध्दाकडे सुस्वरूप अशा नर्तिका पाठविल्या. त्याही पराभूत झाल्या. एक राक्षस तोंडातून नाग बाहेर काढून विष फेकताना दाखवला आहे. हे राक्षस बीभत्स वाटतात. तर या सर्वाच्या मध्ये शांत बसलेले भूमीस्पर्श मुद्रेतील बुध्ददेव एखाद्या अजोड वीरासारखे भासतात. (माटे ः म.श्री.ः 1998; 57) “मारविजय” या प्रसंगातुन भयानक बीभत्स शांत हे रस दिसतातच पण गौतम वाचला असला तरी या प्रसंगाच्या निमित्ताने स्त्रिच्या अंगप्रत्यंगाचे शृंगाराचे स्वैर दर्शन घडविणाच्या मोहातून कलाकाराने शृंगाररस व्यक्त केला आहे.

**Please cite this Article as :**छाया दत्तात्रय कुलकर्णी , अजिंठा चित्रकला व नवरस *‘माझी काटेमुंढरीची शाळा’ (ले. गो. ना. मुनघाटे) सांस्कृतिक समीक्षा*
**: Indian Streams Research Journal (Sept. ; 2012)**

4)चांपेय जातक :- हा कथाप्रसंग गुफा क.1 मध्येच चित्रित झाला आहे. या कथेत चांपेय नाग व बनारसचा राज उग्रसुन यांची धर्मचर्चा चालली आहे. ती ऐकताना दासदासी आपापली कामे विसरून गेलेले दिसतात. पण एका दासी मागचा भस्मपट्टे लावलेला पुरोहित हळूच थाळीतील खाद्य पदार्थ लांबवताना पाहून हसू येते. तसेच याच चित्रात धर्मचर्चा डोक्यावरून जात असल्याने त्रस्त झालेला आठया पाडलेला विदुषक पाहुनही हसू आल्याशिवाय राहत नाही. (थत्ते ः रा.अ. 2004 छ 55) पुरोहिताच्या चेर्हयावरील कानकोडेपणाचा भाव व विदुषकाच्या चेर्हयावरील त्रस्त भाव व एकूण प्रसंग पाहून हास्य रसाचा चांगला अनुभव चित्रकाराने दिला आहे.

5)सौंदरानंद :- गुफा क. 16 मधील या जातक कथाप्रसंगात आनंदाचा संशारत्याग व दीक्षाग्रहण याची सूचना सेवकाच्या हातातील मुगुटावरून सचिंत सुंदरीस मिळते व ती मूर्च्छित होऊन पडते. दास - दासी तिचे पाय चोळताना वारा घालताना पाण्याचा तांब्या आणताना दाखवून प्रसंगाचे गांभिर्य व सुंदरीच्या चेर्हयावरील करून भाव पाहून रसिक हेलावतो.

6)षडदंत जातक :- हा कथाप्रसंग क.17 मध्ये आहे. सहा दात असलेला षडदंत हत्ती आपल्या दोन राण्या महासुभद्रा व चुल्लसुभद्रा यांच्या समवेत जलाशयात मर्दमस्त होऊन कीदा करतो. षड्दंताने महासुभद्रेच्या मस्तकारवर कमलपुष्प वाहिलेले दिसते. चुल्लसुभद्रेवर केवडापत्र उडवलेले दिसते. शृंगाररसात तिघेही मग्न झालेले दिसतात.

7)सिंहलावदाव :- गुफा क.17 मधील चित्रात राजपुत्र विजय श्रीलंकेतील आपल्या मित्रांना सोडविण्यासाठी युध्द करतानाच्या या प्रसंगात तलवारी ढाली बाण चक यांचा उपयोग झालेला दिसतो. तर सैनिक व राजपुत्र विजय वीररसाने भारलेले दिसतात. (थत्ते ः रा.अ.ः 2004; 112) राजपुत्र विजय व सैनिक यांच्या मुद्रा वीरता पूर्ण दाखवून चांगला प्रभाव निर्माण झाला आहे.

8)शृंगार प्रसाधन :- हा विषयसुध्दा चित्रविषय होऊशकतो हेच या कलाकारांनी दाखवून दिले आहे. गुफा क. 17 मधील एका अर्धस्तंभावर यांचे चित्रण आहे. स्नानानंतर एक राज्यकन्या नदीकाठी प्रसाधन करत आहे. चित्रकाराने या राजकन्येचे चित्रण करताना तिचे स्त्री अवयव एकाद्या काव्य पंक्तीप्रमाणे रेखाटून चित्र शृंगाररस प्रधान केले आहे.

9)नलगिरी दमन :- गुफा क.17 मधील या जातक कथा प्रसंगात महात्मा बुध्दास मारण्यासाठी देवदत्त व अजातशत्रू यांच्या कारस्थानाप्रमाणे नलगिरी हत्तीस बुध्दावर सोडतात. हा नलगिरी हत्ती कुध्द होऊन नगरीत धुमाकूळ घालतो. दिसेल ये पायदळी तुडवतो. रौद्र रूपातील हत्ती चितारताना चित्रकाराने त्याची त्वेषपुर्ण झेप उभारलेली शेपटी अंगावरील झूल व माळा विरूध्द दिशेला गेलेल्या दाखवून रौद्र रसाचा परिणाम साधला आहे.

10)गुफा क.10 मध्ये अम्तः पुरात एक श्रेष्ठीपुत्र आपल्या स्त्रीसमवेत मद्यपान करण्यात मश्गुल झालेला दिसतो. दोघेही एकमेकांना अगदी खेटून बसलेले आहेत. मद्याचा अंमल चढलेले दोघांचे चेहरे पाहून शृंगार रसाचा अविष्कार करण्यात चित्रकार यशस्वी झाला आहे असे दिसते.

वरील उदाहरणे ही नमुना दाखल उदाहरणे आहेत. याशिवाय बुध्दजन्म महाकपिजातक सुतसोमजातक मातृपोषक गहाहातक बुर्ध्दयशोधरा भेट प्रसंग यासारख्या अनेक जातकातील प्रसंग चित्रकारांनी रेखाटले आहेत. सुयोग्य रंगसंगती चित्राच्या बाह्यरेषातील गतीमानता बारीकसारीक वस्तुंचे चित्रण व चेर्हयावरील त्या त्या प्रसंगानुरूप भावदर्शन यामुळे चित्रप्रसंग परिणामकारण झाले आहेत.

**निष्कर्ष :-**

अजिंठा चित्रकलेतील चित्रप्रसंगात नवरसाचे चित्रण कलाकाराने केले आहे. परंतु कारूण्य शांत रसाचे चित्रण जास्त प्रसंगात झालेले दिसते. सामान्य माणसाचेही चित्रणही अप्रतिमपणे करण्यात चित्रकार यशस्वी झाला आहे. चित्र काढताना चित्रकार चित्रकलेत पारंगत तर असावाच लागतो. परंतु त्या त्या प्रसंगाशी तद्रुप झाल्याशिवाय असा उच्च प्रतिचा अविष्कार होत नाही. नवरसांनी युक्त अशी अजिंठा चित्रकला आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**


1)Gupta S.P.: Elements of India Art-Indraprastha Asthana S.P. Museum of Art and Archaeology, New Delhi - 2002.
2)थत्ते रा.अ. ः अजिंठा अक्षरमुद्रा प्रकाशन नाशिक - 2004.
3)माटे म.श्री. ः प्राचीन भारतीय कला ः कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे ः 1974.
4)माटे म.श्री. ः प्राचीन भारतीय कलाः कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे ः 1974
5)प्रत्यक्ष भेटी

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net